# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 31.12.2024** **वार – मंगळवार**

---

**नवीनवर्ष**

सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी पुणेकर सज्ज झाले आहेत. यानिमित्त शहराच्या विविध भागात नागरिकांची मोठी गर्दी होत असल्याचं दिसून येत आहे. राज्यातील धार्मिक आणि पर्यटन स्थळे गर्दीने फूलून गेली असून सर्वत्र नव्या वर्षाच्या स्वागताचा उत्साह दिसून येत आहे.

**कोरेगांव**

कोरेगांव भीमा इथं उद्या होणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला असल्याची माहिती पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. विजयस्तंभास अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांना सुविधांची माहिती मिळावी यासाठी जिल्हा परिषदेनं 'विजयस्तंभ सुविधा' ॲप तयार केलं आहे. त्याचबरोबर प्रशासनानं विविध सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

**कराड शरण**

बीड येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आणि पवन ऊर्जा कंपनीला खंडणी मागितल्या प्रकरणी फरार असलेला वाल्मीक कराडला पुणे राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने ताब्यात घेऊन बीडला रवाना केलं आहे. बीडचे अधिकारी याचा तपास करतील अशी माहिती राज्य गुन्हे अन्वेषण विभागाचे अधिकारी सारंग आव्हाड यांनी दिली आहे. वाल्मीक कराड याने आज पुण्यात राज्य गुन्हे अन्वेषण विभागासमोर शरणागती पत्करली. देशमुख हत्या प्रकरणात जे आरोपी असतील त्यांना अटक करण्यात यावी अस वाल्मीक कराड याने गुन्हे अन्वेषण विभागाच्या अधिकाऱ्यांना म्हटलं आहे.

**आयएमए पुणे**

पुण्यातील इंडियन मेडिकल असोसिएशनला 2023-24 साठी राष्ट्रीय स्तरावर  सर्वोत्कृष्ट म्हणून घोषित केले आहे. हैद्राबाद येथे आयोजित राष्ट्रीय परिषदेतील सोहळ्यात अध्यक्ष डॉ राजू वरयाणी, सचिव डॉ. गीतांजली शर्मा आणि विश्वस्त डॉ. संजय पाटील यांनी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोकन यांच्या हस्ते हा राष्ट्रीय पुरस्कार

स्वीकारला. असोसिएशनकडून डॉक्टरांसाठी आयोजित कार्यशाळा, अनेक सामाजिक उपक्रम तसंच रुग्णालय कर्मचाऱ्यांसाठी राबवल्या जात असलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची दखल घेण्यात आली आहे.

**<u>पोस्ट बावधन</u>**

पुणे शहरातील बावधन परिसरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाल्यामुळे तिथल्या नागरिकांसाठी नवीन टपाल कार्यालय सुरू करण्यात आलं आहे. आज महाराष्ट्र आणि गोवा विभागाचे मुख्य पोस्टमास्टर जनरल अमिताभ सिंग यांच्या हस्ते 'बावधन पुणे 411071 'टपाल कार्यालयाचे उदघाटन करण्यात आले. या प्रसंगी पुणे विभागाचे पोस्टमास्तर जनरल रामचंद्र जायभाये यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**<u>महाकुंभ ट्रेन</u>**

महाकुंभमेळयाच्या पार्श्वभूमीवर आयआरसीटीसीच्या वतीने 15 जानेवारी रोजी भारत गौरव पर्यटन रेल्वे पुण्याहून वाराणसी, प्रयागराज, अयोध्येसाठी रात्री दहा वाजता रवाना होईल. महाकुंभ पर्वासाठी आठ दिवस आणि सात रात्रीचा हा प्रवास आहे. अन्य विविध सुविधांबरोबरच एक हजार प्रवाशांच्या जेवणाची व्यवस्था आणि प्रयागराजमध्ये तंबूची व्यवस्थाही करण्यात आली आहे. या सुविधेचा प्रवाशांनी लाभ घ्यावा, असं आवाहन आयआरसीटीसीचे व्यवस्थापक गुरुराज सोना आणि व्यवस्थापक सुभाष नायर यांनी काल पत्रकार परिषदेत केलं.

**<u>वाचन</u>**

वाचन संकल्प महाराष्ट्राचा या वाचन पंधरवडा उपक्रमानिमित्त पुण्यात शासकीय विभागीय ग्रंथालयात उद्यापासून 15 जानेवारीपर्यन्त ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आलं आहे. पुणे जिल्हा मराठी भाषा समितीचे सदस्य सचिव तथा उपजिल्हाधिकारी रामहरी भोसले यांच्या हस्ते या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

**<u>स्मिता</u>**

आरोग्य सेनेतर्फे येत्या 4 आणि 5 जानेवारी रोजी 11 व्या स्मिता पाटील आंतराष्ट्रीय लघुपट महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. पुण्यातील राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय इथं हा महोत्सव होणार आहे. या महोत्सवात जगभरातील 20 देशांतून 175 पेक्षा अधिक लघुपट दाखल झाले आहेत.

**<u>पुणे विद्यापीठ</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसच नाशिक आणि अहिल्यानगर येथील उपकेंद्रांच्या आवारांमध्ये कोणतेही कार्यक्रम घेण्यासाठी 8 दिवस आधी विद्यापीठाची परवानगी घेणे आवश्यक असल्याचं परिपत्रक काढलं आहे. या निर्णयाला विरोध करत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर निदर्शने केली. संबंधित परिपत्रक रद्द करून कोणतेही कार्यक्रम घेण्याच्या पूर्वपरवानगीचा कालावधी 24 तास करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. त्यानंतर विद्यापीठाच्या कुलसचिव ज्योती भाकरे यांच्याबरोबर चर्चा करून आंदोलन थांबवण्यात आले.

**दिव्यांग**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने 17 ते 19 जानेवारी दरम्यान 'जल्लोष- दिव्यांगाचा महाउत्सव' आयोजित करण्यात आला आहे. याच्या नियोजनाबाबत अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संनियंत्रण समिती बैठक पार पडली.

**थकबाकी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाकडून तीन लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या थकबाकीदारांच्या बिगरनिवासी, ओद्योगिक, मिश्र मालमत्ता प्राध्यान्याने जप्त करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. बहुतांश मालमत्तावर जप्तीची कारवाई करण्यात आल्यानंतर एकंदर 4 कोटी 71 लाख 37 हजार 783 रुपयांच्या रकमेचा मालमत्ता कराचा भरणा केला. ही मोहिम सात जानेवारीपर्यंत राबविण्याय येणार असून आवश्यक ती कारवाई केली जाणार असल्याची माहिती संबंधित विभागाने दिली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 31 पूर्णांक 4 तर किमान तापमान 15 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. तर आकाश निरभ्र होतं. उद्याही याच स्वरूपाचे हवामान राहील असं पुणे वेधशाळेनं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**